**प्रेसनोट** **दिनांक २०/०६/२०१९**

## विश्रामबाग पोलीस स्टेशन,पुणेशहर.

## विश्रामबाग पोलीसांनी टाकलेल्या छाप्यामध्ये लाखो रुपयांचे स्टॅम्प पेपर जप्त.

दिनांक १८/०६/२०१९ रोजी देशपांडे स्टॅम्प वेंडर हे शॉप नंबर १ पार्वती माता सोसायटी, शनिवार पेठ पुणे याठिकाणी स्टॅम्प पेपरवर कोषागार कार्यालयाचे शिक्के उमटवून विक्री करीत असलेबाबत गोपनीय बातमी मिळाल्यावरुन माननीय पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ-१, पुणेशहर यांचे मार्गदर्शनाखाली विश्रामबाग पोलीस स्टेशनचे श्री सुनिल कलगुटकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री दादासाहेब चुडाप्पा, पोलीस निरीक्षक (गुन्हे), तपास पथकाचे प्रभारी अधिकारी श्री विजय जाधव, पोलीस हवालदार शरद वाकसे, पोलीस नाईक धिरज पवार, पोलीस नाईक बाबा दांगडे, पोलीस शिपाई संजय बनसोडे, पोशि चेतन शिरोळकर व पोशि प्रशांत शिंदे अशांनी पंचासह वरनमुद मिळालेल्या गोपनीय बातमीची खातरजमा करुन वरनमुद ठिकाणी छापा टाकुन तेथुन ६६,००,०००/- रु. किंमतीची स्टॅम्प पेपर व १२० रु चे कोषागार कार्यालयाचे बनावट शिक्के हस्तगत केले त्याचप्रमाणे सदर स्टॅम्प वेंडरचे लाल महलासमोरील ५९२ बुधवार पेठ पुणे येथील दुकानातुन २,३८,०००/- रु. किं. चे स्टॅम्प पेपर व ५० रु. चे शिक्के असे २,३८,०५०/- रु. चा माल हस्तगत केलेला आहे.

अशा प्रकारे मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार देशपांडे स्टॅम्प वेंडर यांचे वरनमुद शनिवार पेठ व बुधवार पेठ येथील दुकानातुन स्टॅम्प पेपर व बनावट शिक्के असा एकुण ६८,३८,१७०/- रु. किंमतीचा माल जप्त करण्यात आला. सदर प्रकरणी चिन्मय सुहास देशपांडे वय २६ वर्षे, सुहास मोरेश्वर देशपांडे वय ५९ वर्षे व सुचेता सुहास देशपांडे वय ५४ वर्षे सर्व राहणार – पारसनीस वाडा, कसबा पेठ पुणे यांचेविरुध्द विश्रामबाग पोलीस स्टेशन पुणेशहर गु.र.नं. २३२/२०१९, भा.द.वि.सं.कलम ४१९, ४२०, ३४ आणि भारतोच राज्य चिन्ह (अयोग्य उपयोग प्रतिबंध) सन २००५ चे कलम ३, ४, ६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचे तपासकामी वरील तिनही आरोपींना अटक करण्यात आलेली असुन गुन्हयाचा तपास चालु आहे.

(सुनिल कलगुटकर)

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
विश्रामबाग पोलीस ठाणे,पुणेशहर.